1

क्र.महसुल/कक्ष-१/टे-११/एनएपी/वासिंद (शहापूर)/ 173909
सु.बां.प./एसआर-३१/२०२०
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक : 8 FEB 2021

वाचले :-

१. श्री.कृष्णा गजानन जाधव रा.भातसई, पो.वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे यांचा अर्ज दि.०९/०७/२०२०
२. सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील शिफारस पत्र क्र.जा.क्र.बिशेप/बांप/मौ.वासिंद/ता.शहापूर/ससंठाणे/१११३ दि.२७/५/२०१४ व पत्र क्र.बिशेप/बांप/मौ.वासिंद/ता.शहापूर/ससंठाणे/२१३३ दि.२४/११/२०१६
३. या कार्यालयाकडील अकृषिक व बांधकाम परवानगीचे आदेश क्र.महसूल/क-१/टे-११/एनएपी/वासिंद/एसआर-४८/२०१४ दि.७/७/२०१७
४. सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे यांचेकडील सुधारीत शिफारस पत्र क्र.जा.क्र.सुधा.बांप/मौ.वासिंद/ता.शहापूर/स.नं.१९६/अ/२/ससंठाणे/१९४४ दि.९/१२/२०२०
५. अर्जदार यांनी सादर केलेले विहीत नमुन्यातील क्षतिपूर्ती बंधपत्र दि.२३/१२/२०२०
६. महसूल व वनविभाग यांचेकडील क्र.एनएए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दि.१९/८/२०१७ रोजीचे शासन परिपत्रक

---

आदेश :-

ज्या अर्थी, उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील मौजे वासिंद येथील स.नं.१९६/अ/२ एकूण क्षेत्र ३४४०.०० चौ.मी. या जागेवर रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारित बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर करण्यात आलेली आहे.

ज्या अर्थी, अर्जदार यांना उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये शिफारस केलेल्या बांधकाम आराखड्यानुसार उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये मौजे वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं.१९६/अ/२ एकूण क्षेत्र ३४४०.०० चौ.मी. या जमिनीवर रहिवास व अंशतः वाणिज्य प्रयोजनार्थ या कार्यालयाकडून अकृषिक व बांधकाम परवानगीचे आदेश पारीत करणेत आलेले आहेत. आजरोजी सदर जागेवर सुधारीत बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्जदार यांनी विनंती केलेली आहे.

ज्या अर्थी, मौजे वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं.१९६/अ/२ एकूण क्षेत्र ३४४०.०० चौ.मी. ही जागा मंजूर मुंबई महानगर प्रादेशिक योजनेमध्ये समाविष्ट नसून अद्याप तेथे प्रादेशिक/विकास योजनेचा कोणताही प्रस्ताव मंजूर नाही. त्यामूळे त्या ठिकाणी ब व क वर्ग नगरपरिषदांसाठीच्या मंजूर प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीनूसार सद्यस्थितीत विकास वापर अनुज्ञेय आहे.

ज्या अर्थी, मौजे वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं.१९६/अ/२ एकूण क्षेत्र ३४४०.०० चौ.मी. या जमिनीवर रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारीत बांधकाम आराखड्यांस सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे यांनी उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शिफारस केली आहे.

क्र.महसुल/कक्ष-१/टे-११/एनएपी/वासिंद (शहापूर)/173910
सु.बां.प./एसआर-३१/२०२०

त्या अर्थी, आता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४२ (क) अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी ठाणे याद्वारे श्री.कृष्णा गजानन जाधव यांना मौजे वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं.१९६/अ/२ एकूण क्षेत्र ३४४०.०० चौ.मी. या जागेवर रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी सुधारीत बांधकाम परवानगी (अनुज्ञा) पुढील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

<u>त्या शर्ती अशा :-</u>

१. **ही परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४२ (क) व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १८ मधील तरतूदीनुसार देण्यात आलेली आहे.**

२. **प्रस्तावित जागेची मोजणी ३ महिन्याचे आत करून घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.**

३. **जागेवर खुले क्षेत्र व रस्ते यांचे क्षेत्र दर्शविणारा फलक लावणे अर्जदार यांचे बंधनकारक राहील.**

४. यापुर्वी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडील शिफारस पत्र क्र.जा.क्र.बिशेप/बांप/मौ. वासिंद/ता.शहापूर/ससंठाणे/१११३ दि.२७/५/२०१४ व पत्र क्र.बिशेप/बांप/मौ.वासिंद/ता.शहापूर / ससंठाणे/२१३३ दि.२४/११/२०१६ अन्वये या कार्यालयाकडील आदेश क्र.महसूल/क-१/टे-११/ एनएपी/वासिंद/एसआर-४८/१४ दि.७/७/२०१७ अन्वये पारीत केलेले रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ अकृषिक व बांधकाम परवानगीचे आदेश निष्प्रभावित करणेत येत आहेत.

५. प्रस्तावित बांधकामाचा वापर बांधकाम नकाशांत दर्शविल्याप्रमाणे रहिवास व वाणिज्य वापरासाठीच करण्यात यावा.

६. प्रस्तावित योजनेमध्ये खालीलप्रमाणे बांधकामे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| जमिनीचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | भूखंडाचे निव्वळ क्षेत्र (चौ.मी.) | अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) (१.० + ०.२० टेबल क्र.१३ नुसार M.D.R.No.६० असल्याने + ०.२० प्रिमियम शुल्क आकारुन = १.४०) | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | इमारत क्रमांक | मजले/प्रयोजन | एकूण क्षेत्र (चौ.मी.) |
| ३४४०.०० | ३०६८.११ | ४२९५.३५ | इमारत क्र.१ | भागशः तळ + भागशः स्टिल्ट + ६ मजले रहिवास | २७०४.०९ |
| | | | इमारत क्र.२ | तळ + ६ मजले रहिवास व वाणिज्य | १५६६.४७ |
| ३४४०.०० | ३०६८.११ | ४२९५.३५ | ०२ | एकूण | ४२७०.५६ |